Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849197

# “भारतामधील जागतिकीकरण: संधी, परिणाम आणि आव्हाने”

**Dr. Sohan Madhukarrao Pawar** [1]

**प्रस्तावना-**

सन १९९१ पासून भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झालेली आहे. हल्ली आपण जागतिकीकरणाच्या युगात जगत आहोत. जागतिकीकरण हा बाजार सुलभता, व्यापार वाढ, कृषी विकास, रोजगार निर्माती म्हणजेच देशाचा सर्वांगिण विकास जलद गतिने व्हावा या उद्देशाच्या पूर्ती करीता जगाने केलेला नवा प्रयोग आहे. भारताच्या संदर्भात जागतिकीकरणाच्या प्रयोगाला सुरवातीपासूनच विरोध तसेच अनेक बुद्धीवंतानी याचे समर्थनही मोठया प्रमाणात केलेले आहे. भारताला आज जागतिकीकरणाचा स्वीकार करून २५ वर्षपिक्षा अधिक कालावधी झालेला आहे. भारतावर याचा अनुकुल तसेच काही क्षेत्रावर पत्तीकूल परिणाम पहावयास मिळतो आहे. जागतिकीकरणामुळे देशात उद्योग आणि व्यापार क्षेत्र भरभराटीला आलेले आपणास दिसत आहे. यातही माही. ती तंत्रज्ञानाचे श्वेवाने खूप विकास कलेले आहे आणि सध्या रोजगार देण्याच्या बाबतीतही हे क्षेत्र पुढे आहे. आतापर्यंत देशात शेती क्षेत्र रोजगार देण्याच्या बाबतीत पुढे होते. देशात सध्या रोजगारीचा विचार करता ती सन २०१४ पासून कमी होते आहे आणि त्याच्या परिणामस्वरूप देशात दारिद्रयावर प्रतीकुल परीणाम होत असल्याचे जानवत आहे. दारिद्र्य हा क्रयशक्तीशी संबंधित विषय आहे आणि देशात लोकांची खरेदी क्षमता दररोज कमी होत आहे, याला कारण म्हणजे रोजगारीचे प्रमाण देशात कमी होत जाणे हे आहे. सबंधीत विषयाच्या अभ्यासाकरीता दुय्यम साधनांचा आणि संशोधन लेखांचा वापर करण्यात आलेला असून प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश जागतिकीकरणाचा रोजगारी आणि दारिद्रयावर झालेला परिणाम अभ्यासने आहे.आजची विज्ञान व तंज्ञज्ञानातील प्रगती मानवी प्रज्ञेला अवाक करणारी आहे. असे असतांना सुध्दा, चंगळवाद आणि आळशी वृत्ती तिचिच अपत्ये आहेत. अतिशय वेगाने होणाऱ्या सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक बदलामुळे सामाजिक शास्त्रातील सिद्धांतही परिवर्तनशील होणार नाहीत, यात नवल ते कसले? त्यामुळे मानवी व्यवस्थेच्या स्थीर स्वरूपातील वैशिष्ट्यांबद्दल जी वैज्ञानिक परिभाषा सामाजिक शास्त्रांनी मांडली आहे. त्यातील अंदाजात साशंकता निर्माण होतांना दिसत आहे.स्थानिक चस्तु, माहिती, तंत्रज्ञान, गुतवणुक भांडवल याची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया म्हणने नागतिकिकरण होय. प्रत्येक राष्ट्र नागतिकिकरणाचा विविध बाजूने अर्थ स्पष्ट करतात. "जागतिकीकरण माणने संपूर्ण जगाची एका मोठ्या बानारपेठेत रुपांतरीत होण्याची प्रक्रिया होग. वस्तु, सेवा, भांडवल व श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून नागतिक स्तरावर व्यापार मुक्तपणे

[1] Ap Gunjoti Taluka Omerga Dist Dharashiv

घडून येण्याची प्रक्रिया यात समाविष्ठ होते. बॉयस फ्रीडमन च्या मते, 'जागतिकीकरण माणने व्यापार, वित्त आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय. भारताच्या बाबतीत नागतिकीकरण म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थांचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मीकरण करणे होय' जागतिकिरणाच्या माध्यमातून भौगोलिकता व राष्ट्रीय ओळख नष्ठ होऊन इतिहास आणि राजकारणाचा पुर्नजन्म होतांना जागतिक आणि कृति राष्ट्रीय म्हणजेच ग्लोबल टू लोकल याला सर्व क्षेत्रातून प्राधान्य दिले जात आहे. जागतिकीकरणाच्या बाजारपैड, व्यापार, वित्तीय गुंतवणूक, आर्थिक धोरणे, कृषी, रोजगार, मानव संसाधन यावर प्रभाव पडतांना दिसून येतो

**उदिष्टे** :-

1. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करणे,
2. जागतिकीकरणाचे स्वरूप स्पष्ट करणे
3. जागतिकीकरणामुळे शैक्षणिक धोरणात झालेला बदल
4. भारतीय समाजावरील परिणाम स्पष्ट करणे

प्रस्तूत शतकात मानवतेपुढे मोठी आव्हाने उभी आहेत. मानव समाजापुढे काय वाढून ठेवलेले आहे? संघर्ष आणि संहारक युद्धे, की परस्पर शांतामय सहजीवन? अखिल मानव समाजाच्या गरजा पुरविणारा आर्थिक विकास व समृद्धी, की आर्थिक विशमता, शोशण, आणि केव्हाच न संपणारे दारिद्रया? विशेषतः तथाकथित अविकसित राष्ट्रांत कोट्यावधी लोक निरक्षरता आणि अनारोग्याच्या अगतिकतेत आयुष्य कंठत आहेत."पाचशे वर्षांपूर्वी वस्तुविनमय पद्धती अस्तित्वात होती. कार्ल मार्क्सच्या कालखंडापूर्वीपासूनच भांडवलवाद (पूंजिवाद) अस्तित्वात आहे. कार्ल मार्क्सने "Communist Manifesto" नावाचा ग्रंथ लिहीला, त्या दरम्यान सहा वर्षापर्यंत जागतिक मंदी होती. 1991-92 पासून उदारीकरण, खाजगीकरण जागतिकीकरणाचा प्रारंभ झाला. वीस वर्षांचा काळ लोटला परंतू हा कालावधी इतका जास्त नाही, की या संकल्पनाचे चांगल्यारितीने मूल्यमापन होऊ शकेल. पण इतका कमी सुद्धा नाही, की उदारीकरण, खाजगीकरण जागतिकीकरणाच्या मूळ हेतूचे आकलन होऊ शकणार नाही.जागतिकीकरण ही एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. आर्थिक सुधारणेच्या पॅकेजनधील एक महत्वपूर्ण तत्य, एक प्रेरक शक्ती, एक विचारधारा किंवा नववसाहतवाद किंवा नवसाम्राज्यवाद, हे पर्यायी शब्द जागतिकीकरणासाठी वापरले जातात. जागतिक हीत तसेच सुखसमृद्धीची भूल देऊन संपूर्ण जगावर आपले वर्चस्व सिद्ध करणे, हाच जागतिकीकरणामागचा मूळ हेतू आहे. संपूर्ण जगाला एका बाजाराखाली आणून त्यांच्या समस्यांची चर्चा करणे व संपूर्ण जगाला एका वैश्विक ग्रामात (Global Village) परिवर्तित करणे, हा जागतिकरणाचा मूळ उद्देश आहे. 1947 साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्यदेशातील भांडवलशाही व सोव्हिएट रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी प्रणालींचा पाठपुरावा न

करता भारताने लोकशाही समाजबाद, मिश्र अर्थव्यवस्था विनियोजन हा मधला मार्ग चोखळला. परंतु चाळीस वर्षो या तिसऱ्या मार्गावर वाटचाल केल्यानंतर भारतालाही 1991 साली चलन संकटात सापडल्यानंतर मुख्य बाजारी अर्थव्यवस्था उदारीकरण व जागतिकीकरणासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घ्यावा लागलेला आहे. आता असे सर्वसाधारणपणे मानले जाऊ लागले, की भारताचे भविष्य जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेशी अतूटपणे जोडले गेलेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विलीन होण्याशिवाय भारतालाही दुसरा पर्याय नाही, हे कितपत खरे आहे, याचे उत्तर प्रस्तुत शोधनिबंधातून शोधण्याचा प्रयत्न संशोधकाचा हेतू आहे.अमर्त्य सेन यांच्या मते, "जागतिकीकरण अंतिमतः एक फार मोठी लाभदायक शक्ती आहे, परंतु त्याच्या पाठीशी पुरेशा व चांगल्या राष्ट्रीय धोरणांचा पाठींबा हवा, तरच जगात जागतिकीकरणामुळे सुबत्ता येऊ शकेल". प्रातःकाली सूर्याचा एक किरण अंधाराला मागेसारून नव्या दिवसाची सुरुवात करतो, त्याचप्रमाणे जागतिकीकरण हे देखिल देशातील व्यापाराला एक नवीन चालना देते.1991 साली विश्व बैंक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांया "स्ट्रक्चरल ॲडजेस्टमेंट प्रोग्रॅम, अर्थात अर्थव्यवस्थेची पुनर्रचना कार्यक्रम स्वीकारल्यानंतर व गॅट करारावर स्वाक्षरी केल्यानंतर 1 जानेवारी 1995 रोजी जागतिक विश्व व्यापार संस्था स्थापन झाल्यानंतर भारताला या संस्थांच्या नितीनियमानुसार आपले आर्थिक धोरण ठरविणे अपरिहार्य झालेले आहे. त्यामुळे आपल्या आर्थिक प्रभुसत्तेला मुरड घालावी लागेल,1990 साली साम्यवादी अर्थव्यवस्था कोसळल्यानंतर भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय राहिला नाही. या व्यवस्थेचे आता जागतिकीकरण होत आहे. विश्व बैंक, नाणेनिधी, 1995 साली नविन अस्तित्यात आलेली व्यापारी संस्था या जागतिकीकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. याचा अर्थ असा नव्हे की, दारिद्रया, बेरोजगार, आर्थिक शोषण, विशमता, अज्ञान, अनारोग्य, अन्याय हे प्रश्न सोडविण्यात मुक्त भांडवलशाही अर्थव्यवस्था यशस्वी होत आहे किंवा विकसित व अविकसित देशांमधील दरी कमी होत आहे. हे प्रश्न सोडविले नाही तर जागतिकीकरण नव्या आर्थिक साम्राज्यवादाची नांदी ठरेल

**जागतिकीकरणाचे परिणाम** -

१. शेतकऱ्यावर परिणामः

भारतात मागणी व गरजेपेक्षा उत्पादन होऊन देखील कापसाची आयात मोठ्या प्रमाणात केली जात आहे. भारतात १६.४ दशलक्ष गासडया कापसाचे उत्पादन जास्त झाले आहे. याचा अर्थ भारतातील मागणीपेश्वा १ लाख गासडया कापसाचे उत्पादन भारतात जास्त झाले आहे. असे असतांना भारतातील कापसाची आयात प्रचंड प्रमाणात वाढते आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतआहे आणि आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे.

२. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरणः

लोखंड, पोलाद, ॲल्यूमिनियम या धातुची निर्मिती करणारा उद्योग त्यांचे प्रकल्प, तेलाचा शोध घेणे, विज निर्मिती करणे इत्यादी उद्योग सार्वजनिक क्षेत्रातच भारतात सुरू झाले.

बँका, विमा आणि कोळसा उद्योग रेल्वे, विमानसेवा इत्यादी उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू झालेत त्यावर सरकारचीच मालकी होती.

परंतु जागतिकीकरणामुळे सर्व उद्योगाचे खाजगीकरण होत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या दवावाखाली भारताने सार्वजनिक क्षेत्राचे रूपांतर खाजगी क्षेत्रात करण्यास मान्यता दिली आहे.

३. विदेशी गुंतवणूकला प्राध्यान्यः

भारताच्या औद्योगिक विकासाचा पाया असलेले सार्वजनिक उद्योगाचे क्षेत्र मोडीत काढता यावे म्हणून गोवेल्स तंत्राचा वापर करण्यात आला. गॅस अंधारेटी ऑफ इंडिया, मॉडर्न फुड लिमिटेड, हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड, भारत ॲल्युमिनियम कंपनी अशा अब्जावधी रूपये किंमतीची मालमत्ता असणाऱ्या कंपनीचे भागभांडवल खाजगी कंपनीला मातीमोल भावाने विकले गेले. केंद्र सरकार, बैंक, रेल्वे, विमानसेवा यांच्या खाजगीकरणाचे धोरण राववितो आहे.

४. निर्गुतवणूकीचे धोरणः

केंद्र सरकार हे त्याने ठरविलेल्या निगुंतवणूक धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील केंद्राची गुंतवणूक मुक्त करण्यास मुखत्यार आहे. असा निर्वाळा खुद सर्वोच्च न्यायालयानेच दिला. त्यामुळे विशिष्ट उद्योग व क्षेत्रात मक्तेदारी निर्माण झाली, संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण आणि चलननिर्मिती ही चार मुलभूत क्षेत्रे वगळता अन्य सर्व क्षेत्रातील केंद्र सरकारची सार्वजनिक क्षेत्राच्या रूपाने जी गुंतवणूक आहे. ती मुक्त करण्याचे सरकारचे व सत्ताधारी लोकशाही आघाडीचे धोरण आहे असे तत्कालीन केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन यांनी सांगितले होते.

५. पर्यावरणावरील परिणामः

जागतिकीकरणामधून आपण विकासाचे जे प्रारूप स्वीकारले आहे. त्यामधून पर्यावरणाचा नाश होणे अटळ आहे. शासनाने सामायिक जमिन ताव्यात घेतली की तिचा परिणाम निसर्गातील विविधता नष्ट करण्यात होतो. भारतातील अरण्याचे आता उद्योजकासाठी मळे किंवा मध्यमवर्गासाठी सहलीची स्थाने यात रूपांतर होत आहे. जागतिक बँकेकडून वनविकास व पर्यावरण विकास म्हणून ज्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. त्याचा हापरिणाम होय.

६. वाढती बेकारीः

गेल्या काही वर्षात लोकशाहीचा जो सर्वत्र व्हास होताना दिसतो त्यांचे कारण कामगारवर्गाचा शक्तीचा न्हास हेच होय. सामाजिक लोकशाहीसाठी चालणाऱ्या चळवळीमध्ये

कामगारवर्ग ही एक मोठी शक्ती होती. तिच्या न्हासालाही जागतिकीकरण कारणीभूत आहे.

**भारतासमोरील आव्हानेः**

१. आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण कसे करावे हे एक आव्हान आहे.
२. कष्टकरी वर्गाचे शोषण कसे थांचवता येईल.
३. शिक्षण महागडे झाल्यामुळे, शिक्षण कसे द्यावे हे सुध्दा एक आव्हान आहे.
४. वेरोजगारी दूर कशी करावी.
५. शेतीतील साम्राज्यवादाला कसे थांबवावे.
६. सार्वजनिक उद्योगाचे रक्षण करणे.
७. जागतिक नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना, गॅट करार यांच्या धोक्यापासून कसे वाचवावे.
८. जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचे रक्षण करणे.
९. नागरीकांच्या आरोग्याचे रक्षण कसे करावे

**निष्कर्षः**

१. जागतिकीकरणामुळे देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे.
२. जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचा न्हास झालेला आहे.
३. जागतिकीकरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. ४. जागतिकीकरणामुळे बेरोजगारी वाढली आहे.
४. जागतिकीकरणामुळे सार्वजनिक उद्योग बंद पडले आहेत.
५. जागतिकीकरणामुळे शिक्षण महाग झाले आहे.
६. जागतिकीकरणामुळे शेती ही कॉरपोरेट झालेली आहे. जागतिकीकरणामुळे विदेश गुंतवणूक वाढली आहे.

**संदर्भ** :

1) ॲडमिरल विष्णू भागवत - जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती, ऑक्टोबर २००७.

2) नलिनी पंडित- जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती जानेवारी २००४.

3) डॉ. जी.एन. झामरे भारतीय अर्थव्यवस्था, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आतन्नी जून २०१४.

4) दै. लोकसत्ता- २५ जानेवारी २०१६.

5) मिश्रा व पूरी भारतीय अर्थ व्यवस्था.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*